# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेसनोट क्रमांक ३२६/२०२४** **दिनांक- २२/०८/२०२४.**

**"मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकाम करून लोकांकडून पैसे उकळून फसवणूक करुन दोन वर्षांपासून आर्थिक गुन्हे शाखेस पाहिजे असणारा आरोपी मध्यवर्ती गुन्हे शाखेकडून जेरबंद."**

आचोळे पोलीस ठाणे गुरनं । १) १९५/२०२२, भादंविसंक ४२०, ३४, एम.आर.टी.पी. ॲक्ट ५२, ५३, ५४ मधील फिर्यादी नामे श्रीमती विशाखा मोटघरे, सहायक आयुक्त, वसई विरार मनपा यांनी दिनांक २६/०४/२०२२ रोजी फिर्याद दिली की, वसई विरार मनपा हददीत मोठया प्रमाणात अनाधीकृत बांधकाम केले असुन सदर बांधकाम विकासक यांनी बांधकाम विभागाची कोणतीही परवानगी न घेता आरक्षीत जागेवर बिल्डींग उभी करुन त्यातील रुम लोकांना विक्री करुन लोकांची फसवणुक केली म्हणून विकासकांविरुध्द वरील प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले होते.

पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांनी आढावा बैठकीत आर्थिक गुन्हे शाखेतील पाहिजे आरोपी यांना पकडणे बाबत सुचना देण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे मा. प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. राहूल राख, मध्यवर्ती गुन्हे शाखा, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे सुचनांप्रमाणे सपोनि नितीन बेंद्रे, सपोउपनि मनोहर तावरे, पोहवा प्रविण पवार, अनिल नागरे यांनी वरील गुन्हयांचा समांतर तपास सुरु केला असता पाहिजे आरोपी नरेंद्र ऊर्फ मुन्ना राजमनी सिंह, हा गुन्हा घडले पासुन आपले अस्तीत्व लपवुन राहत होता. नमुद आरोपीताची गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषन करुन नमुद आरोपी हा मदर तेरेसा स्कुल पेल्हार व्हिलेज येथे येणार आसल्याची खात्रीशिर बातमी मिळाले वरुन त्यास पोलीस पथकासह जावून सापळा लावून ताब्यात घेतले आहे. त्याचेकडे केलेल्या प्राथमिक तपासामध्ये त्याचा खालील गुन्हयात सहभाग असल्याचे आढळून आले असून त्याला पुढील कारवाईकामी आर्थिक गुन्हे शाखा, मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

आरोपीचे पुर्ण नाव व पत्ता-नरेंद्र ऊर्फ मुन्ना राजमनी सिंह, धंदा-बांधकाम व्यावसाईक व शाळा चालक रा. बी/३०८, फ्रेनी कॉ.हौ.सोसा. युनियन बँक समोर, वसई लिंक रोड, नालासोपारा पुर्व.

- आरोपी खालील नमुद गुन्हयात पाहीजे आरोपी होता.

१) १९५/२०२२, भादंविसंक ४२०, ३४, एम.आर.टी.पी. ॲक्ट ५२, ५३, ५४.
२) ६९/२०२३, भादंविसंक ४२०, ३४, एम.आर.टी. पी.ॲक्ट ५२, ५३, ५४.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), व श्री. मदन बल्लाळ सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्र.पोनि. राहुल राख, पोनि धनंजय पोरे, सपोनि नितीन बेंन्द्रे, दत्तात्रय सरक, पोउपनिरी हितेंद्र विचारे, सहा.फौज श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, आसिफ मुल्ला, संतोष चव्हाण, पोहवा राजवीरसिंह संधु, प्रविण पवार, अनिल नागरे, महेश वेल्हे, शिवाजी पाटील, गोविंद केन्द्रे, राजाराम काळे, संग्राम गायकवाड, हनुमंत सुर्यवंशी, संतोष मदने, अकिल सुतार, सतिश जगताप पोअं अंगद मुळे, नितीन राठोड, साकेत माघाडे यांनी केली आहे.

---------oooo--------